# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई . वांद्रे- कुर्ला संकुल बान्द्रा (पुर्व).मुंबई ४०० ०५१ .

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५८ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

बैठक स्थळ :- मा. मंत्री ग्रामविकास व कामगार यांचे दालन क्र.३०२, ३ रा मजला, मंत्रालय मुंबई

दिनांक :- १७.०६.२०२१ (गुरूवार)

वेळ :- दुपारी ०१.३० वाजता

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | मंडळाच्या दिनांक ०२.०३.२०२१ रोजी संपन्न ५७ व्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे. | ०५ |
| २. | शासन मान्यतेनुसार प्रति बांधकाम कामगार रू.१५००/- प्रमाणे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरीत अर्थसहाय्याचा जिल्हानिहाय तपशील मंडळाच्या माहितीस्तव सादर करणे. | ०५-०७ |
| ३. | मे. एच.एल.एल लाईफकेअर या संस्थेमार्फत मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची अँटीजन टेस्ट व RT-PCR टेस्ट करणेबाबत विचारविनिमय करणे. | ०७-०८ |
| ४. | मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचे कोविड-१९ विषाणू पासून संरक्षणाकरीता मोफत लसीकरण करणे व बांधकाम कामगारांकरीता लसीकरणाचा राखीव साठा उपलब्ध करणेबाबत विचारविनिमय करणे. | ०८-०९ |
| ५. | कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत बांधकामाच्या ठिकाणी उपलब्ध नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना दुपारचे व रात्रीचे भोजन वितरीत करणे व बांधकाम कामगारांच्या हिश्याची रक्कम (रू.०५/-) न घेणेबाबतची सवलत दि.३१.०५.२०२१ च्या पुढे चालू ठेवणेबाबत विचारविनिमय करणे. | ०९-१० |
| ६. | मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत शासन मान्यतेनुसार राज्यातील एकूण २२ जिल्हयातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना बांधकामाच्या ठिकाणी व नाक्याच्या ठिकाणी नियुक्त संस्थांमार्फत मध्यान्ह भोजन वितरणाची कार्यवाही मंडळाच्या माहितीस्तव सादर करणे. | ११ |
| ७. | मंडळाकडे नव्याने नोंदीत/ नुतनीकरण झालेल्या नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करणेबाबत. | १२-१३ |
| ८. | केंद्र शासनाकडून इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ६० अंतर्गत निर्गमित दि.२२.०३.२०२१ रोजीच्या आदेशाची प्रत मंडळाच्या माहितीकरीता सादर. | १३-१४ |
| ९. | बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण, लाभ वाटप, बांधकाम कामगारांचे समुपदेशन व अन्य सुविधांकरीता तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत विचार विनिमय करणे. | १४-२० |
| १०. | मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांसाठी आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू | २१-२२ |

| अ. क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | करणेबाबत फेर विचार विनिमय करणे | |
| ११. | मंडळामार्फत ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभवाटपाबाबत प्रसार व प्रसिध्दी करीता माध्यम निहाय वार्षिक आराखडयास मंजूरी देणेबाबत विचारविनिमय करणे. | २२-२४ |
| १२. | मंडळाच्या कामकाजाकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांना देण्यात आलेल्या भाडयाच्या वाहनास मुदतवाढ व अंदाजित खर्च मंजूरीबाबत विचारविनिमय करणे. | २४-२५ |
| १३. | शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या पॅनेलवरील संस्थांकडून मंडळ मुख्यालय व जिल्हा कार्यालयाकरीता मायक्रोसॉफ्ट ऑफिस परवाना (license) खरेदीस व अपेक्षित खर्चास मान्यता प्रदान करणेबाबत विचारविनिमय करणे | २६ |
| १४. | मंडळाच्या कामकाजासाठी नियुक्ती केलेल्या सल्लागारांच्या नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत | २६-२७ |
| १५. | कामगार आयुक्त कार्यालय ४ था मजला व मंडळ मुख्यालयास साफसफाई करण्यास मे. अस्तित्व मल्टीपर्पोझ सर्व्हिसेस (ओ.पि.सी) प्रा. लि. यांना पूर्वीच्याच मंजूर दराने एक वर्ष मुदतवाढ देण्याबाबत विचारविनिमय करणे. | २७-२८ |
| १६. | केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत वाटप करण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभाचे Social Audit करणेबाबत विचारविनिमय करणे. | २८-२९ |
| १७. | मंडळाच्या जमा उपकर निधीच्या गुंतवणूकीचा गोषवारा मंडळाच्या मान्यतेस सादर करणे | २९-३१ |

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १७.०६.२०२१ रोजी संपन्न झालेल्या ५८ व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. हसन मुश्रीफ, मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५८ वी बैठक गुरूवार दिनांक १७.०६.२०२१ रोजी दुपारी ०१.३० वा. मा. मंत्री ग्रामविकास व कामगार यांचे दालन क्र.३०२, ३ रा मजला, मंत्रालय मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. हसन मुश्रीफ | मा.मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्रीम. विनिता वेद सिंघल, प्रधान सचिव, कामगार | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार आयुक्त | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. शशांक साठे, सह सचिव काम-७ | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. अशोक गोविंदराव भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ९. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय,कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक ०२.०३.२०२१ रोजीच्या मंडळाच्या ५७ व्या बैठकीच्या इतिवृत्तांताची प्रत तसेच पारित ठरावाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.०१ :- मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजी संपन्न ५७ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५७ वी बैठक दिनांक ०२.०३.२०२१ रोजी दुपारी १.०० वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मा.अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे. सदर इतिवृत्तातांत काही बदल असल्यास सुचवावा अशी विनंती मंडळ सचिवांनी केली. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५८(१)/२०२१:- मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०२ :- शासन मान्यतेनुसार प्रति बांधकाम कामगार रू.१५००/- प्रमाणे नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरीत अर्थसहाय्याचा जिल्हानिहाय तपशील मंडळाच्या माहितीस्तव सादर करणे**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र राज्य यांनी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत राज्यात ब्रेक द चेन अंतर्गत निर्बंध घोषित करताना दि.१३.०४.२०२१ रोजी राज्यातील विविध घटकांना अर्थसहाय्य वितरणाची घोषणा केली होती. यामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना प्रत्येकी रू.१५००/- प्रमाणे अर्थसहाय्य थेट त्याच्या बँक खात्यात जमा करण्याची घोषणाही करण्यात आली होती. मा. मुख्यमंत्री महोदयांच्या सदर घोषणेस अनुसरून मंडळाकडून दि.१५.०४.२०२१ रोजी सादर प्रस्तावास शासनाच्या दि.२२.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये दि.२२.०४.२०२१ पूर्वी नोंदीत बांधकाम कामगार लाभार्थ्यांना प्रत्येकी रू.१५००/- इतके एकवेळचे अर्थसहाय्य थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती.

२. शासन मान्यतेस अनुसरून मंडळाने कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत यापूर्वी दोन टप्प्यामध्ये पहिला टप्पा रू.२०००/- व दुसरा टप्पा रू.३०००/- प्रमाणे एकुण रू.५०००/- प्रमाणे १०,०५,०३१ बांधकाम कामगारांना अर्थसहाय्य वितरीत केले होते.

३. मंडळाचे बचत खाते सेंट्रल बँक ऑफ इंडिया बीकेसी शाखा मध्ये असल्याने सदर बँकेस प्रति दिन जास्तीत जास्त बांधकाम कामगारांच्या खात्यात अर्थसहाय्य वितरीत करणेबाबत विनंती केली असता सदर बँकेने प्रति दिन ५०,००० पेक्षा जास्त बांधकाम कामगारांच्या खात्यात निधी वर्ग करण्यास लेखी स्वरूपात असमर्थता दर्शविली. यासंदर्भात मा. अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांचेशी विचारविनिमय करून आयसीआयसीआय बँकेत तात्पुरत्या स्वरूपात बचत खाते उघडण्यात आले व दि.२३.०४.२०२१ ते ३०.०४.२०२१ पर्यंत बहुतांश बांधकाम कामगारांच्या खात्यात अर्थसहाय्य जमा करण्यात आले होते. दि.२३.०४.२०२१ ते दि.०३.०६.२०२१ या कालावधीत ११,६८,२३४ बांधकाम कामगारांचा डाटा बँकांना पाठविण्यात आला होता त्यापैकी १०,६५,५३८ बांधकाम कामगारांच्या खात्यात अर्थसहाय्याची रक्कम जमा करण्यात आलेली आहे. दि.२३.०४.२०२१ ते ०३.०६.२०२१ या कालावधीत बांधकाम कामगारांच्या खात्यात जमा अर्थसहाय्याचा जिल्हा निहाय तपशील सोबत सादर करण्यात आला. IWBMS करीता नियुक्त संस्थेकडील छाननीअंती प्राप्त त्रुटीचा डाटा व बँकेकडून Transaction Fail चा डाटा जिल्हा कार्यालयाकडून दुरूस्त करून प्राप्त झाल्यानंतर सदर बांधकाम कामगारांच्या खात्यात अर्थसहाय्याची रक्कम जमा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

४. याबाबत अध्यक्ष महोदयांनी विचारणा केली की, बांधकाम कामगारांचे बँक खाते कोणत्या बँकेत उघडण्यात आले आहे. याबाबत खुलासा सादर करताना सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, बांधकाम कामगारांची खाती राष्ट्रीयीकृत बँका, खाजगी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अशा विविध बँकांमध्ये उघडण्यात आलेले आहेत. मागील ०२ ते ०३ वर्षात विविध राष्ट्रीयीकृत बँकेचे एकत्रीकरण झाल्यामुळे IFSC कोड व बँक खाते क्रमांकात बदल झालेला आहे. तसेच, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे IFSC कोड चुकीचे नमूद केल्यामुळे अर्थसहाय्याची रक्कम जमा करण्यात अडचणी येतात. अशा बांधकाम कामगारांची खाते क्रमांक जिल्हा कार्यालयाकडून फेरतपासून अर्थसहाय्याची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते. यामुळे अर्थसहाय्य वितरणास विलंब होतो. याबाबत मा.अध्यक्ष महोदयांनी निर्देश दिले की, कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीतील अर्थसहाय्याची रक्कम व मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचे अर्थसहाय्य बांधकाम कामगारांना सहज व जलद गतीने मिळणेकरीता सर्व नोंदीत बांधकाम कामगारांचे बचत खाते आयसीआयसीआय या बँकेत उघडण्यात यावे. याबाबत सर्व नोंदीत बांधकाम

कामगारांना परिपत्रक, लघुसंदेश किंवा प्रसार माध्यमा मार्फत कळविण्यात यावे. सदर कार्यवाहीस सर्व मंडळ सदस्यांनी सहमती दर्शविली.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला

**ठराव क्र.५८(२)/२०२१ :-**

**१. शासन मान्यतेनुसार दि.२३.०४.२०२१ ते ०३.०६.२०२१ या कालावधीत प्रति कामगार रू.१५००/- प्रमाणे १०,६५,५३८ नोंदीत बांधकाम कामगारांना वितरीत अर्थसहाय्य व सदर अर्थसहाय्य वितरणावरील खर्च रू.१५९.८३ कोटी एवढया खर्चाची मंडळाकडून नोंद घेण्यात आली.**

**२. मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना अल्प कालावधीत अर्थसहाय्याची रक्कम वितरीत करता यावी याकरीता मा. अध्यक्ष महोदय यांच्या मान्यतेने आयसीआयसीआय बँकेत तात्पुरत्या स्वरूपात बचत खाते उघडण्यात आले. सदर कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**३. मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांचे बचत खाते आयसीआयसीआय या बँकेत उघडण्यात यावे. याबाबत सर्व नोंदीत बांधकाम कामगारांना परिपत्रक, लघुसंदेश व प्रसारमाध्यमा मार्फत कळविण्यात यावे.**

**वरीलप्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०३ :- मे. एच.एल.एल लाईफकेअर या संस्थेमार्फत मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची अँटीजन टेस्ट व RT-PCR टेस्ट करणेबाबतचा प्रस्ताव माहितीस्तव सादर.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मे.एच.एल. एल. लाईफकेअर लिमिटेड यांनी त्यांच्या दि.१९.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत लॉकडाऊन/ ब्रेक द चेन मुळे आरोग्य तपासणी होऊ शकली नाही तथापि, त्यांच्या संस्थेमार्फत राज्यात कार्यरत प्रयोगशाळा मार्फत कोविड-१९ विषाणूचे अँटीजन टेस्ट व RT-PCR टेस्ट तसेच कोविड-१९ विषाणूचे प्रादुर्भाव झाल्यानंतरचे उपचार करण्यात येत आहेत. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत विषाणू प्रादुर्भावाची तपासणी व तपासणी अंती पॉझिटीव्ह रूग्णांचे विलगीकरण करणे आवश्यक आहे. यास्तव मे. एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड ही संस्था विषाणूचा जास्त प्रादुर्भाव झालेल्या भागात नोंदीत बांधकाम कामगारांची विषाणू प्रादुर्भावाबाबत अँटीजन टेस्ट व RT-PCR टेस्ट करण्यास तयार आहे. जेणेकरून बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची वेळीच तपासणी होऊन

तपासणी अंती पॉझिटीव्ह रूग्णांचे विलगीकरण करणे शक्य होईल व त्या भागातील विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यास मदत होईल. मे. एच.एल. एल. लाईफकेअर लिमिटेड या संस्थेने कोविड-१९ विषाणू अँटीजन टेस्ट करीता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णयान्वये मंजूर प्रति व्यक्ती रू.२००/- व RT-PCR टेस्ट करीता प्रति व्यक्ती रू.५००/- प्रमाणे तपासणी खर्चाचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर खर्चामध्ये सॅम्पल कलेक्शन, सॅम्पल ट्रान्सपोर्टेशन, टेस्टींग व रिपोर्टींग या बाबींचा समावेश आहे.

२. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या पत्र क्र. इबांका-२०१९/प्र.क्र.१७/काम-७ दि.३१.०५.२०२१ च्या पत्रान्वये खालील अटी शर्तीसह शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. शासन मान्यतेनुसार मंडळाच्या दि.०२.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये याबाबत करारनामा करणेसाठी व्यवस्थापक मे. एलएलएल लाईफ केअर प्रा.लि. यांना कळविण्यात आलेले आहे.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८(३)/२०२१ :- उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या पत्र क्र.इबांका-२०१९/प्र.क्र.१७/काम-७दि.३१.०५.२०२१ च्या पत्रान्वये कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची अँटीजन टेस्ट व RT-PCR टेस्ट सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.३१.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर दराने मे.एच.एल.एल. लाईफकेअर लिमिटेड या संस्थेमार्फत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय :- ०४ मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांचे कोविड-१९ विषाणू पासून संरक्षणाकरीता मोफत लसीकरण करणे व बांधकाम कामगारांकरीता लसीकरणाचा राखीव साठा उपलब्ध करणेबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मे. क्रेडाई पुणे मेट्रो यांनी त्यांच्या दि.१३.०५.२०२१ रोजीच्या प्रस्तावामध्ये क्रेडाई मार्फत बांधकामाच्या ठिकाणी कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव टाळण्यासाठी सामाजिक अंतर, थर्मल स्क्रिनिंग व सॅनिटायझेशन सारख्या उपाययोजना करण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. क्रेडाई मार्फत पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पीएमआरडीए क्षेत्रातील २०० बांधकामाच्या ठिकाणावरील १८ वर्षापेक्षा जास्त वयाच्या ५०,००० पेक्षा जास्त कामगारांचा डाटा जमा केलेला आहे. सदर कामगारांच्या लसीकरणाकरीता स्थानिक प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. तथापि, कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाची गती व बांधकाम कामगारांची

संख्या विचारात घेता बांधकाम कामगारांच्या हितास्तव खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

१. मंडळाकडील जमा उपकरामधून बांधकामाच्या ठिकाणावरील बांधकाम कामगार व त्यांच्या कुटूंबियांचे लसीकरण करण्यात यावे.
२. पीएमआरडीए क्षेत्रातील बांधकाम कामगारांकरीता लसीकरणाचा राखीव साठा उपलब्ध करून देण्यात यावा.
३. बांधकामाच्या ठिकाणी मोफत अँटीजन टेस्टची व्यवस्था करण्यात यावी.

याबाबत असेही सादर केले की, केंद्र शासनाने घोषित केल्यानुसार देशातील सर्वच नागरिकांचे मोफत लसीकरण होणार आहे तसेच, मंडळाच्या आजच्या बैठकीतच मे. एच एलएल लाईफ केअर लिमिटेड या मंडळाच्या नियुक्त संस्थेमार्फत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मंजूर दराने रॅपीड अँटीजन टेस्ट व RTPCR टेस्ट करण्यात येणार आहे. पीएमआरडीए क्षेत्रातील बांधकाम कामगारांकरीता लसीकरणाचा साठा राखीव ठेवण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना शासन स्तरावरून कळविता येईल.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८ (४)/२०२१ :- केंद्र शासनाने देशातील सर्व नागरिकांचे मोफत लसीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे, मंडळाकडून मे. एच एलएल लाईफ केअर लिमिटेड या संस्थेकडून रॅपीड अँटीजन टेस्ट व RTPCR टेस्ट करण्यात येणार आहे. मा. जिल्हाधिकारी पुणे यांना पीएमआरडीए क्षेत्रातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी कोविड- १९ विषाणू प्रतिबंधक लसीचा साठा राखीव ठेवणेबाबत शासन स्तरावरून मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०५ :- कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत बांधकामाच्या ठिकाणी उपलब्ध नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना दुपारचे व रात्रीचे भोजन वितरीत करणे व बांधकाम कामगारांच्या हिश्याची रक्कम (रू.०५/-) न घेणेबाबतची सवलत शासन मान्यतेने दि.३१.०८.२०२१ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे, माहितीस्तव सादर.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाच्या ०२.०३.२०२१ रोजीच्या ५७ व्या बैठकीत पारित ठरावानुसार सदर सवलत दि.३१.०५.२०२१ रोजी संपत आहे. मंडळाची आगामी बैठक दि.१७.०६.२०२१ रोजी प्रस्तावित आहे. सदर सवलत पुढे चालू ठेवण्याबाबत दि.३१.०५.२०२१ रोजी शासन मार्गदर्शनार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

२. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या पत्र क्र. इवांका-२०१८/प्र.क्र.५२/काम-७ दि.३१.०५.२०२१ अन्वये मुंबई/ नवी मुंबई, ठाणे, पालघर, पुणे व नागपूर या ०५ जिल्हयातील नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन वितरीत करण्यास व बांधकाम कामगार हिश्याची रक्कम रू.०५/- इतकी वसूल न करण्यास दि.०१.०६.२०२१ ते ३१.०८.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

३. शासनाच्या दि.२७.०४.२०२१ व दि.१२.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये ११ व ०६ (एकुण १७) जिल्हयात मध्यान्ह भोजन योजना राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर १७ जिल्हयांमध्ये दि.०१.०६.२०२१ ते ३१.०८.२०२१ या कालावधीमध्ये सदर योजना कार्यान्वित झाल्यापासून दि.३१.०८.२०२१ पर्यंत सदर जिल्हयातील बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन वितरीत करण्यास व कामगार हिश्याची रक्कम रू.०५/- वसूल न करण्यासही शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. शासन मान्यतेनुसार सर्व जिल्हा कार्यालयांना मंडळाच्या दि.०१.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहे.

४. शासनाच्या दि.१६.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मुंबई /नवी मुंबई, ठाणे, पालघर, पुणे व नागपूर या ०५ जिल्हयातील नाक्याच्या ठिकाणी नोंदीत सक्रिय जिवीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन वितरीत करणेबाबत शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित जिल्हा कार्यालयांना कार्यवाही करणेबाबत मंडळाच्या दि.१८.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.५८(५)/२०२१ :- कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीत मुंबई/नवी मुंबई, ठाणे, पालघर, पुणे व नागपूर या ०५ जिल्हयात तसेच नव्याने मान्यता प्रदान करण्यात आलेल्या १७ जिल्हयातील बांधकामाच्या ठिकाणी उपस्थित नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजनासह रात्रीचे भोजन वितरीत करणे व कामगार हिश्याची रक्कम प्रति भोजन रू.०५/- वसूल न करणे ही सवलत दि.०१.०६.२०२१ ते दि.३१.०८.२०२१ पर्यंत सुरू ठेवण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली असून शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०६ :- मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत शासन मान्यतेनुसार राज्यातील १७ जिल्हयातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना बांधकामाच्या ठिकाणी व नाक्याच्या ठिकाणी नियुक्त संस्थांमार्फत मध्यान्ह भोजन वितरणाची कार्यवाही मंडळाच्या माहितीस्तव सादर करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडून दि.१२.०३.२०२१ व दि.०६.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार राज्यातील अन्य जिल्हयात (प्रायोगिक तत्वावरील ०५ जिल्हे वगळून) बांधकामाच्या ठिकाणी नाक्याच्या ठिकाणी मध्यान्ह भोजन वितरणाकरीता उपलब्ध बांधकाम कामगारांची संख्या जिल्हा कार्यालयाकडून मागविण्यात आली होती. जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावानुसार मंडळाच्या दि.१२.०४.२०२१ व दि.०३.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सादर प्रस्तावास अनुसरून उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.२७.०४.२०२१ व दि.१२.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अमरावती, नाशिक, औरंगाबाद, जळगांव, कोल्हापूर, अहमदनगर, सांगली, सातारा, सोलापूर, नांदेड, लातूर, रायगड, बीड, जालना, भंडारा, चंद्रपूर, वर्धा या १७ जिल्हयातील बांधकामाच्या ठिकाणावरील व नाक्याच्या ठिकाणावरील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

२. शासन मान्यता प्रदान करताना निविदेतील अटी शर्तीनुसार स्वयंपाकघर, प्रयोगशाळा व अन्न पदार्थ व्यवस्था करणे आवश्यक राहील असे नमूद करण्यात आले आहे. शासन मान्यतेनुसार मंडळाच्या दि.२९.०४.२०२१ व दि.१४.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये बांधकामाच्या ठिकाणी व नाक्याच्या ठिकाणावरील बांधकाम कामगारांची अंदाजित संख्या नियुक्त संस्थांना कळवून निविदेतील अटी शर्तीनुसार स्वंयपाकघर, प्रयोगशाळा स्थापन करणे व वाहतूक व्यवस्थेची पूर्तता करण्याच्या अधीन राहून करारनामा करण्यासाठी मंडळ कार्यालयास उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८ (६)/२०२१ :- उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.२७.०४.२०२१ व दि.१२.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अनुक्रमे ११ व ०६ (एकूण १७) जिल्हयात मध्यान्ह भोजन योजना लागू करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. शासन मान्यतेनुसार नियुक्त संस्थांसोबत करारनामा करून पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०७ :- मंडळाकडे नव्याने नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करणेबाबत.**

मंडळाचे सचिवांनी सादर केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाबाबत मंडळाच्या दि.२२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत पारित ठरावास अनुसरून शासन मान्यतेस सादर प्रस्तावास दि.२२.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अत्यावश्यक संच व दि.२३.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुरक्षा संच वाटपास शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती. शासन मान्यतेनुसार सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपास वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती.

२. सुरक्षा संच व अत्यावश्यक वाटपाकरीता नियुक्त संस्थांना माहे जानेवारी २०२० पर्यंत दिलेल्या पुरवठा आदेशानुसार दि.०७.०४.२०२१ पर्यंत एकुण १३,८४,७३० संचापैकी १२,५६,८१३ अत्यावश्यक संच व १२,४४,०१५ सुरक्षा संच वाटप करण्यात आलेले आहे. आजपावेतो दिलेल्या पुरवठा आदेशापैकी १,२७,९१७ अत्यावश्यक संच व १,४०,९१५ सुरक्षा संच वाटप करणे शिल्लक आहे. सन्माननीय विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य, अन्य लोकप्रतिनिधी, कामगार संघटना व बांधकाम कामगार यांच्या संच वाटपाबाबतच्या मागणीस अनुसरून माहे डिसेंबर २०१९ नंतर ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने नोंदीत बांधकाम कामगारांपैकी संच वाटपाकरीता शिल्लक बांधकाम कामगारांच्या संख्येबाबतचा तपशील मंडळाच्या IWBMS करीता नियुक्त संस्थेकडून मागविण्यात आला. ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने बांधकाम कामगार नोंदणी व बांधकाम कामगार नुतनीकरणाबाबतच्या उपलब्ध डाटामधून संच वाटप न झालेल्या बांधकाम कामगारांचा जिल्हानिहाय तपशील मे. आयटीआय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. (IWBMS) यांचेकडून प्राप्त करण्यात आला. संच वाटपाबाबतची मागणी व संच वाटप न झालेल्या बांधकाम कामगारांचा मे. आयटीआय लि. व मे. आरसीएस इन्फो लि. या संस्थेने सादर केलेला तपशील विचारात घेता साधारणत: ३.५० लक्ष बांधकाम कामगारांना संच वाटप झालेले नाही याबाबतचा प्रस्ताव दि.१७.०५.२०२१ रोजी शासन निर्णयास्तव सादर करण्यात आला होता. उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.इबांका-२०२१/प्र.क्र.८४ काम-७ दि.०२.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये नव्याने नोंदीत/ नुतनीकरण झालेल्या ३.५० लक्ष बांधकाम कामगारानांही नियुक्त संस्थेमार्फत खालील अटी शर्तीनुसार संच वितरीत करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.

**ठराव क्र.५८(७)/२०२१ :- उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.इबांका-२०२१/प्र.क्र.८४ काम-७ दि.०२.०६.२०२१ अन्वये माहे डिसेंबर २०१९ नंतर ऑफलाईन व ऑनलाईन पध्दतीने नोंदणी/ नुतनीकरण झालेले व सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वितरीत न झालेल्या ३.५० लक्ष बांधकाम कामगारांना ई-निविदा प्रकियेद्वारे मंजूर दराने सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे तसेच, संच वाटपाकरीता दोन वर्षाची मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली आहे. त्यानुसार नियुक्त संस्थांसोबत करारनामा करून जिल्हानिहाय संच वाटपाच्या संख्येसह पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाकरीता मंडळ स्तरावरून करण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०८:- केंद्र शासनाकडून इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ६० अंतर्गत निर्गमित दि.२२.०३.२०२१ रोजीच्या आदेशाची प्रत मंडळाच्या माहितीकरीता सादर.**

यावाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, केंद्र शासनाकडून इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ६० अंतर्गत निर्गमित दि.२२.०३.२०२१ रोजीच्या आदेशाची प्रत मंडळाच्या माहितीस्तव बैठकीत सादर करण्यात आली होती. सदर आदेशात खालील मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजनांबाबत खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

*Following directions are issued to the State/ UT BOCW Welfare Boards under Section 60 of the BOCW Act. 1996:-*

*i) The Social security and other coverages stipulated under Section 22(1)(a) to (g) will hold precedence over any other benefit being provided to the registered workers under Section 22 (1) (h) of the Act. After meeting these priority expenses as mentioned in Section 22 (1) (a) to (g) of the Act, any balance of cess fund can be utilized by BOCW Boards for giving additional benefits as per mandates given under Section 22 (1)(h) of the Act. The BOCW Boards shall submit an annual Statement to DG, Labour Welfare by 30th April on the expenditure made on items under Section 22(1)(a) to (g) and the money remaining to be spent and actually spent on Section 22 (1)(h).*

*ii) Any monetary assistance under the welfare schemes are to be provided*

*through Direct Benefit Transfer (DBT) only in the beneficiary's bank account.*

*iii) No benefit is to be provided in-kind except in extra-ordinary circumstances such as natural calamities, epidemics, fire, accidents caused due to occupational hazard or similar other crisis, and with prior approval of the State Government and intimation to DG Labour Welfare, Govt Of India.*

२. महाराष्ट्र शासन नियोजन विभागाच्या शासन निर्णय दि.०५.१२.२०१६ अन्वये विविध कल्याणकारी योजनांमध्ये मिळणाऱ्या लाभांचे हस्तांतरण थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करणेबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे. शासन निर्णया सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये विविध विभागामार्फत लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या एकूण ४४ साधन सामुग्रींची यादी देण्यात आलेली आहे. तसेच, नियोजन विभागाच्या दि.०३.०३.२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये मूळ शासन निर्णयातील परिशिष्ट 'अ' मध्ये एकुण १८ वस्तूंचा समावेश करण्यात आला. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८ (८)/२०२१ :- केंद्र शासनाकडून इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम ६० अंतर्गत निर्गमित दि.२२.०३.२०२१ रोजीच्या आदेशाची मंडळाने नोंद घेतली आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०९:- बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण, लाभ वाटप, बांधकाम कामगारांचे समुपदेशन व अन्य सुविधांकरीता तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दि.३०.०७.२०१४, दि.२६.०८.२०१५ व दि.०१.१०.२०१५ रोजी संपन्न बैठकीत मंडळाच्या एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापनाकरीता बाहय यंत्रणेची नियुक्ती करणेबाबत ठराव पारित करण्यात आला होता. मा. प्रधान सचिव, कामगार विभाग, मा. कामगार आयुक्त व मा. विकास आयुक्त, असंघटीत कामगार यांची संयुक्त बैठक दि.०२.०६.२०१७ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीतील निर्णयानुसार कामगार विभागांतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ व असंघटीत कामगार मंडळ वेगवेगळे असले तरी दोन्ही मंडळामार्फत असंघटीत कामगारांची नोंदणी व कल्याणकारी योजनांचा लाभ देणे अभिप्रेत आहे. त्यामुळे

एकाच विभागांतर्गत दोन मंडळाकरीता वेगवेगळे कार्यालये न ठेवता कामगारांच्या सोयीकरीता एकच कार्यालय असावे, कामगारांकरीता सुविधा केंद्र स्थापन करणे व सदर सुविधा केंद्रामध्ये संगणकीय प्रणाली विकसित करून त्याबाबतचे हार्डवेअर व नेटवर्किंग करणे व त्याचे मेंटेनन्स करणे ही दोन वेगवेगळी कामे असून सदर दोन्ही कामासाठी स्वतंत्र कौशल्याची (Skill Set) गरज आहे. जिल्हा कामगार सुविधा केंद्रामध्ये असंघटीत कामगार मंडळाकरीताही जागेची तरतूद करण्यात यावी. राज्यात ४२ ठिकाणी भाडयाच्या जागेवर साधारणत: १२०० चौ. फुट एवढया क्षेत्रात कार्यालय स्थापन करण्यात यावे. राज्यातील ०६ ठिकाणी जिल्हा कार्यालयासोबतच विभागीय कार्यालये साधारणत: १८०० चौ. फुट एवढया जागेत स्थापन करणेबाबत निर्णय घेण्यात आला होता.

२. मंडळाच्या दि.०६.०६.२०१७ रोजीच्या संपन्न बैठकीतील पारित ठरावानुसार व शासन मान्यतेअंती राज्यातील ४२ ठिकाणी मंडळ मुख्यालय, ०६ विभागीय कार्यालये व ३५ जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएटस या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पॅनलवरील मे. ॲकोटॅक कन्सल्टंट यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली व मंडळ व शासन मान्यतेअंती दि.२७.०५.२०१९ रोजी रीतसर करारनामा करून कार्यादेश देण्यात आले आहेत. राज्यातील प्रस्तावित ४२ ठिकाणी मुख्यालय, विभागीय/ जिल्हा कामगार सुविधा केंद्रांपैकी मुख्यालय व २६ विभागीय/जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. ०८ ठिकाणी विभागीय/जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेची कार्यवाही दि.३०.०७.२०२१ पर्यंत पूर्ण होईल. उर्वरित ०८ ठिकाणी जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरीता जागेचा शोध घेण्यात येत आहे. विभागीय व जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत जिल्हानिहाय सद्यस्थिती सोबतच्या प्रपत्रात नमूद करण्यात आली आहे. विभागीय व जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेकरीता ३१.०३.२०२१ पर्यंत रू.९.१४ कोटी एवढा खर्च झालेला आहे.

३. मा. श्री. बाळासाहेब पाटील, मंत्री सहकार, पणन महाराष्ट्र राज्य त्यांच्या दि.१७.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये ता. कराड जि. सातारा येथे व मा. राज्यमंत्री महोदय कामगार विभाग यांच्या दि.१९.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तालुका चांदूर बाजार जि. अमरावती येथे जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत विनंती करण्यात आली आहे.

४. मे. आयटी आय लिमिटेड या संस्थेने त्यांचे पत्र क्र. आयटीआय/आरओ/मुंबई २०२०-२१ दि.०३.०६.२०२१ अन्वये बांधकामाची ठिकाणे राज्यात सर्वदूर विखुरलेली

आहेत, तालुका स्तरावरही बांधकामे होत आहेत. सदर बांधकाम कामगारांना नोंदणी, नुतनीकरण व लाभाकरीता जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा कामगार सुविधा केंद्र/ जिल्हा कार्यालयात वारंवार यावे लागते त्यामुळे त्यांचा रोजगार बुडतो, वेळ वाया जातो, कामगारांचा रोजगार बुडाल्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीतील निर्बंधामुळे जिल्हा कार्यालयांनाही भेट देणे शक्य होत नाही. त्यामुळे तालुकास्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत मंडळास विनंती केली आहे. तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन झाल्यास खालील फायदे होतील असे त्यांच्या प्रस्तावात नमूद केले आहे.

i) तालुका स्तरावर कामगार सुविधा केंद्र स्थापन झाल्यास नोंदणी व नुतनीकरणाची व्याप्ती वाढून जास्तीत जास्त बांधकाम कामगारांना मंडळाच्या योजनांचा लाभ मिळेल.
ii) जिल्हा कामगार सुविधा केंद्र / जिल्हा कार्यालयात गर्दी होणार नाही, बांधकाम कामगारांना जिल्हयाच्या ठिकाणी जाण्याकरीता प्रवास करावा लागणार नाही जेणेकरून कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव कमी होऊन आरोग्य यंत्रणेवरील ताण कमी होईल.
iii) बांधकाम कामगारांना नजीकच्या अंतरावर नोंदणी नुतनीकरण करून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता येईल त्यामुळे कामगार विभाग व शासनाची प्रतिमा उंचावेल.

५. मंडळाच्या संपूर्ण कामकाजाच्या संगणकीकरणाकरीता मे. आयटी आय लिमिटेड मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. या संस्थेची नियुक्ती करण्यात आली होती. सदर संस्थेसोबत रीतसर करारनामा करून दि.०८.०३.२०१९ रोजी कायादेश देण्यात आले होते. मे. आयटी आय लिमिटेड मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांना दिलेल्या कार्यादेशानुसार राज्यातील ४१ जिल्हा/ विभागीय कार्यालयात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

- Design, development, operations, Installation and maintenance of Comprehensive Software services
- ICT Hardware Installation & DC, DRC Management
- Project Management/ Handholding
- Operations & maintenance of WFC
- Personnel Deployment
- Helpdesk/Call Centre

६. मंडळाने जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेकरीता मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स यांची व सल्लागार म्हणून मे. अँकोटेक कन्सल्टंट यांची नियुक्ती केलेली आहे. मंडळामार्फत विभागीय कार्यालय व जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरीता जागा उपलब्ध करून दिल्यानंतर

सदर संस्थेमार्फत कार्यालयाकरीता दालन, फर्निचर, विद्युत जोडणी व्यवस्था इत्यादीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेनंतर संगणक, प्रिंटर, इतर अनुषंगिक साहित्याचा व प्रति जिल्हा कार्यालय ०५ या प्रमाणे मनुष्यबळाचा पुरवठा मे. आयटी आय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. या संस्थेमार्फत करण्यात येतो.

७. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मे. आयटी आय लिमिटेड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत सादर केले की,

अ. मंडळाकडून जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरीता भाडे तत्वावर जागा उपलब्ध करून दिल्यानंतर टेक्नोकाफ्ट असोसिएट्स या संस्थेमार्फत मे. ॲकोटेक यांच्या सल्ल्याने कार्यालय स्थापनेची कार्यवाही करण्यात येत आहे. जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेनंतर आयटी आय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. यांनी निविदेतील अटी शर्तीनुसार व मंडळाकडून दिलेल्या कार्यादेशानुसार ३५ जिल्हा कामगार सुविधा केंद्र व ०६ विभागीय (जिल्हा कामगार सुविधा केंद्रासह) कार्यालयांना संगणक, प्रिंटर इतर अनुषंगिक साहित्याचा व प्रति जिल्हा कार्यालय ०५ या प्रमाणे मनुष्यबळाचा पुरवठा करणे अपेक्षित आहे. उर्वरित ३१६ तालुक्यात (३५७-४१) पुरवठयाची तरतूद नाही. मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स यांच्यासोबतच्या करारातही ४१ ठिकाणी कार्यालय स्थापनेची तरतूद आहे. अन्य ठिकाणी कार्यालये स्थापनेची तरतूद नाही.

ब. केंद्र शासनाकडून माहे जुलै २०२० मध्ये निर्गमित मिशन मोड प्रोजेक्ट सोबतच्या प्रपत्रात राज्य निहाय अंदाजित बांधकाम कामगारांची संख्या नमूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील अंदाजित बांधकाम कामगार संख्या २३,१५,१७७ एवढी नमूद करण्यात आलेली आहे. मंडळाकडे सन २०११ पासून माहे मार्च २०२१ पर्यंत २५,५३,५१९ एवढया बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे त्यापैकी ११,८२,१५२ बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रिय (जिवीत) आहे.

क. मंडळामार्फत माहे जुलै २०२० पासून ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटप करण्यात येत आहे. दि.०९.०६.२०२१ पर्यंत ७,१८,२५९ बांधकाम कामगारांनी नोंदणी करीता, ४,४९,९६१ बांधकाम कामारांनी नुतनीकरणाकरीता व २,८४,७९४ बांधकाम कामगारांनी लाभ मिळणेकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केले आहे. त्यानुसार सदर अर्जांची छाननी करून नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

ड. बांधकाम कामगारांना जिल्हयातील कोणत्याही ठिकाणाहून ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व लाभाचे अर्ज सादर करता येत आहेत त्याकरीता जिल्हयाच्या

ठिकाणी येण्याची आवश्यकता नाही. तसेच, ऑनलाईन नोंदणी/ नुतनीकरणानंतर नोंदणी फी व वर्गणीची रक्कम सुध्दा ऑनलाईन पध्दतीने Payment Gateway मार्फत भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर नोंदणी फी ऑनलाईन पध्दतीने जमा करताच SMS द्वारे बांधकाम कामगारांना नोंदणी क्रमांक देण्यात येईल तदनंतर लगेचच बांधकाम कामगारांना विविध योजनांच्या लाभाकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करता येईल. बांधकाम कामगारांच्या मदतीकरीता हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आले आहे.

इ. इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या कलम २४ (३) नुसार वेतन भत्ते, मानधन, बैठका व अन्य प्रशासकीय बाबींवरील खर्च आर्थिक वर्षातील योजनांवरील खर्चाच्या ५% च्या मर्यादेत असावा अशी तरतूद आहे.

८. याबाबत मा. अध्यक्ष महोदय व सर्व सन्माननीय सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. सदर चर्चेत सद्यस्थितीत बांधकाम कामगारांच्या ऑनलाईन नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाकरीता जिल्हास्तरावर जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यात आले आहे/ येत आहे. राज्यातील बांधकाम कामगार कमी शिकलेले आहेत तसेच परप्रांतीय बांधकाम कामगारांची संख्या जास्त आहे. परप्रांतीय बांधकाम कामगारांची भाषा भिन्न असल्यामुळे नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाच्या प्रक्रियेत सहभागी होताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. अधिनियमातील बांधकामाच्या व्याख्येची व्याप्ती वाढवून शासन अधिसूचनेनुसार बांधकामाशी संबंधित २१ कामांचा समावेश बांधकामाच्या व्याख्येत करण्यात आला आहे. सदर २१ कामांमध्ये दगड कापणे, फोडणे व दगडाचा बारीक चुरा करणे, लादी किंवा टाईल्स कापणे, पॉलिश करणे, रंग, वार्निश लावणे, सुतारकाम, गटार व नळ जोडणीचे काम अशा प्रकारच्या कामाचा समावेश करण्यात आला आहे. अशा कामावर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांचीही मंडळाकडे नोंदणी होणे आवश्यक आहे. याकरीता जिल्हा स्तरावरील जिल्हा कामगार सुविधा केंद्राची मदत अपुरी पडणार आहे. बांधकाम कामगारांना नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाकरीता मदत करण्यासाठी तालुकास्तरावरही तालुका सुविधा केंद्राची स्थापना करणे आवश्यक आहे. तालुका सुविधा केंद्रामध्ये नोंदणी, नुतनीकरण व लाभाचे अर्ज सादर करण्यास बांधकाम कामगारांना मदत करावी व सदर अर्ज तपासणी व मंजूरीच्या प्रक्रियेकरीता जिल्हा कार्यालयांना ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात यावे. पुढील कार्यवाही जिल्हा कार्यालयाकडून करण्यात यावी. तालुकास्तरीय केंद्र स्थापनेसाठी कामगार कल्याण मंडळ, शासकीय, निमशासकीय, ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका इत्यादी संस्थांकडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रानुसार जागा उपलब्ध करून घेण्यात यावी. ग्रामपंचायत/ पंचायत समिती किंवा

नगरपालिका/ नगर परिषद परिसरात जागा उपलब्धतेबाबत कामगार विभागाकडून ग्रामविकास विभाग व नगर विकास विभागास विनंती करण्यात यावी. जर अशा जागा उपलब्ध झाल्या नाहीत तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रानुसार खाजगी व्यक्ती/ संस्थांकडून जागा भाडयाने घेण्यात यावी. तालुका सुविधा केंद्राकरीता प्रत्येकी ०१ किंवा ०२ किंवा आवश्यकतेप्रमाणे कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. मंडळाच्या एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS) करीता ई- निविदा पध्दतीने नियुक्त मे. आयटीआय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. या संस्थेकडून वाटाघाटी अंती मंजूर दराने सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाकरीता आवश्यक संगणक, प्रिंटर व अनुषंगिक साहित्याचा पुरवठा मंडळाकडून करण्यात यावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले.
याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८(९)/२०२१ :-**

**१. मंडळाकडून विभागीय कार्यालये व जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेच्या सद्यस्थितीची मंडळाने नोंद घेतली.**

**२. राज्यातील ३५७ तालुक्यांपैकी ४१ जिल्हास्तरीय तालुक्यात कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे/ येत आहे. उर्वरित ३१६ तालुक्यातील इमारत व इतर बांधकामावर काम करणारे बांधकाम कामगार व बांधकामाशी संबंधित २१ कामांवर काम करणाऱ्या बांधकाम कामगारांच्या नोंदणी, नुतनीकरण व लाभाचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याच्या मदतीसाठी तालुका कामगार सुविधा केंद्र स्थापन करण्यात यावे.**

**३. तालुका कामगार सुविधा केंद्रामध्ये प्रथमत: डेटा एंट्री ऑपरेटर/ फिल्ड एजंट स्तरावरील प्रत्येकी ०२/०३ कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती मंडळाच्या एकात्मिक कल्याण मंडळ व्यवस्थापन प्रणाली (IWBMS) करीता ई- निविदा पध्दतीने नियुक्त मे. आयटीआय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. या संस्थेकडून करण्यात यावी. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मासिक पारिश्रमिक तसेच, संगणक, प्रिंटर व अनुषंगिक साहित्याचा पुरवठा मे. आयटीआय लिमिटेड व मे. आरसीएस इन्फो प्रा.लि. या संस्थेकडून मंजूर दराने करण्यात यावा.**

**४. तालुका सुविधा केंद्राकरीता टेबल, खुर्ची व अन्य फर्निचरचा पुरवठा जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापनेकरीता ई- निविदा पध्दतीने नियुक्त मे. टेक्नोक्राफ्ट असोसिएट्स या संस्थेकडून मंजूर दराने करण्यात यावा.**

**५. तालुका सुविधा केंद्राकरीता साधारणत: ५०० ते ७०० चौरस फूट जागा तालुका**

**स्तरावर कामगार कल्याण मंडळ, शासकीय व निमशासकीय कार्यालये, पंचायत समिती, नगरपालिका इत्यादी संस्थांकडून अथवा खाजगी व्यक्ती/संस्थांकडून भाडेतत्वावर घेण्यात यावी.**

६. **ग्रामपंचायत/पंचायत समिती किंवा नगरपंचायत/नगरपालिका परिसरात जागा उपलब्ध करून देण्यासाठी कामगार विभागाकडून ग्रामविकास विभाग व नगरविकास विभागास विनंती करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.**

७. **तालुका सुविधा केंद्राकरीता जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भाडे प्रमाणपत्रानुसार अदा करण्यात यावे.**

८. **तालुका सुविधा केंद्र स्थापन करणे, तालुका सुविधा केंद्राची कार्यकक्षा, मनुष्यबळ, फर्निचर व अनुषंगिक बाबींवरील खर्चाचा सविस्तर प्रस्ताव त्वरीत शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.**

**असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१० मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना त्यांच्या कुटूंबियांसाठी आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजन लागू करणेबाबत फेर विचार विनिमय करणे**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दि.०२.०३.२०२१ रोजी संपन्न ५७ व्या बैठकीत ठराव क्र.५७ (०२)/२०२१ अन्वये मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुधारणा/ बदल करणे, योजना बंद करणे, प्रस्तावित नवीन योजना कार्यन्वित करणे इत्यादीबाबत विचारविनिमय करताना केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेऐवजी सद्यस्थितीत मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता राज्याची महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना राबविणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

२. केंद्र शासनाच्या नॅशनल हेल्थ ॲथोरिटीच्या मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.११.०५.२०२१ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य सोसायटी यांना पाठविलेल्या पत्रात खालील मुद्दे नमूद केले आहे.

१. नॅशनल हेल्थ अँथोरिटी व केंद्र शासनाचे कामगार व रोजगार विभागादरम्यान आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB PM-JAY) इमारत व इतर बांधकाम कामगारांकरीता राबविणेबाबत करार करण्यात आलेला आहे.

२. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना बिहार, चंदीगड व उत्तरप्रदेश मध्ये दि.०१.०५.२०२१ पासून लागू करण्यात आलेली आहे. सदर योजना दि.०१.०६.२०२१ पासून देशातील सर्व राज्यात राबविणे प्रस्तावित आहे. सदर योजना राज्य शासनाच्या राज्य आरोग्य सोसायटीमार्फत राबविणे प्रस्तावित आहे.

३. राज्य आरोग्य सोसायटीने इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळासोबत समन्वय साधून याबाबतचा करारनामा करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

४. केंद्र शासनाच्या नॅशनल हेल्थ अँथोरिटीकडून प्राप्त सूचनेस अनुसरून मंडळासोबत करारनामा करणे (करारनामा प्रारूप सोबत मंडळास प्राप्त झाला आहे) व इतर बाबी विषयी चर्चा करणेबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना व मंडळाचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना बोलविण्यात आले होते. तथापि, काही करणास्तव सदर बैठक होऊ शकली नाही.

५. मा. मंत्री महोदय, कामगार  विभाग तथा अध्यक्ष मइवइबाक मंडळ यांचेसोबत मंडळ बैठकीची विषयपत्रिका अंतिम करण्यासाठी दि.०२.०६.२०२१ रोजी संपन्न बैठकीत प्राप्त निर्देशानुसार महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मिळणारे लाभ, सदर लाभ मिळण्याकरीता येणाऱ्या अडी- अडचणी, योजनेंतर्गत उपचार, रूग्णालयाकडून मिळणारा प्रतिसाद याबाबत राज्य आरोग्य हमी सोसायटी, क्षेत्रिय कार्यालये व कामगार संघटनाकडून अभिप्राय मागविण्यात आले आहे. त्याबाबतचा तपशील बैठकीत सादर करण्यात आला.

याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८(१०)/ २०२१ :- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता राज्य शासनाची महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना व केंद्र शासनाची आयुष्यमान भारत योजना या दोन्ही योजना लागू करण्यात याव्यात. नोंदीत बांधकाम कामगाराला दोन योजनांपैकी एकाच योजनेची निवड करण्याची मुभा राहील. आयुष्यमान भारत योजनेबाबत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्य आरोग्य हमी सोसायटी सोबत आवश्यक करारनामा करण्यात यावा. नोंदीत**

**बांधकाम कामगारांकरीता आयुष्मान भारत योजनेच्या विमा हफ्त्याचा राज्य शासनाचा हिस्सा व प्रति कुटूंब रू.५०/- प्रमाणे योजनेच्या कार्डचा प्रशासकीय खर्च मंडळाच्या उपकर निधीमधून भागवावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.११ :- मंडळामार्फत ऑनलाईन पध्दतीने नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभवाटपाबाबत प्रसार व प्रसिध्दी करीता माध्यम निहाय वार्षिक आराखडयास मंजूरी देणेबाबत विचारविनिमय करणे.**

यावाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाकडे बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, केंद्र शासन व राज्य शासनामार्फत वारंवार निर्देश देण्यात येत आहे. विधानमंडळाच्या अधिवेशनातही विविध आयुधाद्वारे विचारणा करण्यात आलेल्या मुद्यांमध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविणे व लाभ वाटप करणेबाबत विचारणा करण्यात येत आहे.

२. आर्थिक वर्ष २०१९-२० करीता माध्यमनिहाय रू. ३०.०० कोटीचा वार्षिक आराखडा तयार करण्यात आला होता. शासन व मंडळ स्तरावरून बाबनिहाय मंजुर आराखडयातील विविध बाबीवर झालेला प्रत्यक्ष खर्च रू. २५.१६ कोटी व प्रस्तावित खर्च ०.९५ कोटी विचारात घेता एकुण खर्च रू. २६.११ कोटी एवढा खर्च झालेला आहे/प्रस्तावित आहे.

३. आर्थिक वर्ष २०२०-२१ करीता माध्यमनिहाय रू.३०.०० कोटीचा वार्षिक आराखडा मंडळ बैठकीत मंजूर करण्यात आला होता. सदर आराखडयास शासन मान्यता प्राप्त झाली होती. तथापि, सदर आराखडयात काही प्रमाणात दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने सुधारित आराखडा मंडळाच्या दि.२७.१०.२०२० रोजी संपन्न बैठकीत मंजूर करण्यात आला होता. वित्त विभागाच्या शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र. अर्थसं- २०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दि.१६.०९.२०२० अन्वये कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव कालावधीतील प्राप्त निर्बंधामुळे सन २०२०-२१ मध्ये प्रसार प्रसिध्दीवर खर्च करता आलेला नाही.

४. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता मंडळाकडील नोंदणी व विविध कल्याणकारी योजनांची प्रचार प्रसिध्दी व जनजागृती करण्यासाठी रक्कम रू. ३०.०० कोटीचा माध्यमनिहाय वार्षिक आराखडा मंडळाच्या विचारविनिमयाकरीता सादर करण्यात आलेला आहे.

सादर आराखडयाबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला

**ठराव क्र.५८(११)/२०२१:- मंडळाकडील नोंदणी, नुतनीकरण व विविध कल्याणकारी योजनांच्या लाभाची जनजागृती, प्रसार व प्रसिध्दी करीता सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी खालीलप्रमाणे रू.३०.०० कोटी एवढया रक्कमेचा माध्यमनिहाय आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | माध्यम | दर मंजूर करणारी संस्था | माध्यमनिहाय प्रस्तावित खर्च (रू. कोटी) |
|---|---|---|---|
| १ | MSRTC Panels | As per DGIPR rate | ३.०० |
| २ | Hoardings | As per DAVP rate | १.०० |
| ३ | MSRTC Hoardings | As per DAVP rate | १.०० |
| ४ | Bus Queue Shelters (in Mumbai) | As per DAVP rate | २.०० |
| ५ | MSRTC announcements at Bus Stands | As per Approved rate | २.०० |
| ६ | Documentary Production | As per DGIPR rate | ०.१० |
| ७ | Radio Spot & Jingle Production | As per DGIPR rate | ०.१६ |
| ८ | Mobile LED Van for Promotion | As per Approved rate | २.०० |
| ९ | Print | As per DGIPR rate | ४.०० |
| १० | TV Media | As per DAVP rate | ३.५० |
| ११ | Electronic Sign Board | As per DGIPR rate | ५.५४ |
| १२ | Social Media | As per Approved rate | ०.१० |
| १३ | Radio | As per DAVP rates | १.०० |
| १४ | TV Creative Production | As per DGIPR rate | ०.६० |
| १५ | Best/TMC/ NMMC/ other Muncipal Corporation Panells | As per Approved rate | ३.०० |
| १६ | Government Hoardings at Collector office/ SDO/ | As per DGIPR rate | १.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | ZP/ PS etc. | | |
| | | Total | ३०.०० |

**असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१२ :- मंडळाच्या कामकाजाकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांना देण्यात आलेल्या भाडयाच्या वाहनास मुदतवाढ व अंदाजित खर्च मंजूरीबाबत विचारविनिमय करणे.**

यावाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दि.०४.०९.२०१९ रोजीच्या बैठकीतील ठरावानुसार कामगार आयुक्त कार्यालयाअंतर्गत कार्यरत विभागीय कार्यालय व जिल्हा कार्यालयाकरीता बोलेरो/स्कॉर्पीओ अथवा तत्सम प्रकारचे वाहन जिल्हा कार्यालय प्रमुखांनी संबंधित जिल्हयाच्या प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) यांनी निश्चीत केलेल्या दराने अथवा संबंधित विभागाच्या अपर कामगार आयुक्त/कामगार उप आयुक्त यांच्या मान्यतेने मासीक भाडयाचे दर व धाव निश्चीत करून प्रथम एक वर्षाकरीता वाहन भाडेतत्वावर उपलब्ध करून घेण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती.

२. मंडळाचे कामकाज कामगार आयुक्त कार्यालयाअंतर्गत अधिकारी व कर्मचारी करत असतात मंडळाकडील बांधकाम कामगारांच्या ऑनलाईन पध्दतीने नोंदणी व नुतणीकरणात दिवसेदिवस वाढ होत आहे. मंडळाचे कामकाज जिल्हयाच्या शहरी भागापासून ग्रामिण भागापर्यंत पसरलेले असून यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांना तालुका व गाव पातळीवरील कामगारांच्या तपासणीसाठी जावे लागते. त्यामुळे मंडळाचे कामकाज सुलभरीत्या पार पाडणेकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांना वाहनाची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत एकूण ४१ जिल्हा कार्यालयांपैकी १९ जिल्हा कार्यालयांनी वाहन भाडयाने घेतले आहे.

३. सर्व कार्यालयांनी वाहन भाडेतत्वावर घेतलेले नाही. तथापि, उपरोक्त प्रमाणे सर्व जिल्हा कार्यालयांनी भाडेतत्वावर वाहन घेतल्यास वार्षिक अंदाजित रू.३.०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. मा. मंत्री महोदय, कामगार विभाग व मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांचेसोबत दि.२७.०५.२०२१ रोजी झालेल्या चर्चेअंती खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देणे प्रस्तावित आहे. त्यानुसार मंडळाच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

अ. नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाकरीता ऑनलाईन पध्दतीने जिल्हा कार्यालयास प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार दौरा करून सर्व अर्ज निकाली काढावे.

ब. मध्यान्ह भोजन योजना, आरोग्य तपासणी, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप

तसेच प्रस्तावित कौशल्य वृध्दीकरण योजना राबविण्यात येत असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी अथवा शिबीराच्या ठिकाणी दरमहा कमीत कमी १० भेटी देण्यात याव्यात.

क. जिल्हा कार्यालयांनी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाशी संबंधित कामाकरीता वाहन वापराची दैनंदिनी विभागीय कार्यालयामार्फत दरमहा मंडळास सादर करावी.

ड. विभागीय कार्यालयांनी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाशी संबंधित कामाकरीता वाहन वापराची दैनंदिनी स्वतंत्रपणे मंडळास सादर करावी.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८(१२)/२०२१ :- मंडळाच्या कामकाजाकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांनी घेतलेल्या भाडयाच्या वाहनास खालील अटी शर्तीच्या अधीन राहून पुढील ०१ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.**

**अ. नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपाकरीता ऑनलाईन पध्दतीने जिल्हा कार्यालयास प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार दौरा करून सर्व अर्ज निकाली काढावे.**

**ब. मध्यान्ह भोजन योजना, आरोग्य तपासणी, सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप तसेच प्रस्तावित कौशल्य वृध्दीकरण योजना राबविण्यात येत असलेल्या बांधकामाच्या ठिकाणी अथवा शिबीराच्या ठिकाणी दरमहा कमीत कमी १० भेटी देण्यात याव्यात.**

**क. जिल्हा कार्यालयांनी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाशी संबंधित कामाकरीता वाहन वापराची दैनंदिनी विभागीय कार्यालयामार्फत दरमहा मंडळास सादर करावी.**

**ड. विभागीय कार्यालयांनी इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाशी संबंधित कामाकरीता वाहन वापराची दैनंदिनी स्वतंत्रपणे मंडळास सादर करावी.**

**भाडयाच्या वाहनाकरीता प्रती वाहन प्रति माह सरासरी रू.६०,०००/- या दराने ४२ वाहनांकरीता वार्षिक खर्च अंदाजित रू.३.०० कोटीच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१३:-** **शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या पॅनेलवरील संस्थांकडून मंडळ मुख्यालय व जिल्हा कार्यालयाकरीता मायक्रोसॉफ्ट ऑफिस परवाना (license) खरेदीस व अपेक्षित खर्चास मान्यता प्रदान करणेबाबत विचारविनिमय करणे**

यावावत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळामार्फत जिल्हा कार्यालयांना पुरविण्यात आलेल्या संगणकाकरीता मायक्रोसॉफ्ट ऑफिस परवाना (Licenses) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यामुळे या संगणकामध्ये कार्यालयाचा असलेला महत्वपूर्ण डाटा उदा. कर्मचाऱ्यांची नोंदणी, नुतनीकरण, लाभ वाटप, कोविड कालावधीतील अर्थसहाय्य बावतचा तपशिल इत्यादी माहितीचे जतन व संरक्षण होण्याच्या दृष्टीने मायक्रोसॉफ्ट ऑफिस परवाना (Licenses) खरेदी करणे आवश्यक आहे.

२. जिल्हा कार्यालयाकरीता प्रत्येकी दोन व मंडळ स्तरावरील संगणक संख्या विचारात घेऊन एकुण ९५ मायक्रोसॉफ्ट ऑफिस परवाना (Licenses) खरेदी करणे आवश्यक होते. त्यानुसार शासनाचे माहिती व तंत्रज्ञान विभागाचे परिपत्रक क्र.०६०/३/२०१७/२ दि. ०४.०८.२०१८ अन्वये शासनाने Empanelled केलेल्या विक्रेत्यांकडून दरपत्रके मागविण्यात आली. शासन पॅनेलवरील संस्थांकडून मागविण्यात आलेल्या दरामध्ये मे.इ एस.डी.एस. सॉफटवेअर सोल्यूशन प्रा.लि. यांचे प्रति मायक्रोसॉफ्ट ऑफिस परवाना (Licenses) रू. ५६१/- असे न्यूनत्तम दर प्राप्त झाले आहे. सदर न्यूनत्तम दराने मे. इ एस.डी.एस. सॉफटवेअर सोल्यूशन प्रा.लि. या संस्थेकडून एकुण ९५ मायक्रोसॉफ्ट ऑफिस परवाने (Licenses) खरेदीचा मासीक व वार्षिक खर्चाचा तपशिल मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८(१३)/२०२१ :- जिल्हा कार्यालये व मंडळ मुख्यालयातील एकुण ९५ संगणकाकरीता मायक्रोसॉफ्ट ऑफिस परवाना (Licenses) मे.इ.एस.डी.एस. सॉफटवेअर सोल्यूशन प्रा.लि. या शासन पॅनेलवरील विक्रेत्याकडून खरेदी करण्यास व त्यावरील वार्षिक खर्च रू.६,७१,५२०/- (अधिक वस्तू व सेवा कर) एवढया खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१४:-** **मंडळाच्या कामकाजासाठी नियुक्ती केलेल्या सल्लागारांच्या नियुक्तीस मुदतवाढ देणेबाबत**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंत्रालयातील आयटीविषयक कामाकरीता दोन व मंडळाच्या आयटीविषयक कामाकरीता दोन अशा एकूण चार सल्लागारांची मे. ग्रॅन्ट

थॉर्न्टन या संस्थेकडून मंडळाच्या ठरावानुसार नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन निर्णय दि.०४.०५.२०२० अन्वये निर्गमित वित्तीय उपाययोजनेस अनुसरून वित्त विभागाचे दि.१४.०८.२०२० रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये सल्लागारांच्या मानधनाच्या दरात किमान ३०% कपात करावी असे आदेश निर्गमित करण्यात आले होते. वित्त विभागाचे दि.१४.०८.२०२० रोजीचे शासन शुध्दीपत्रक दि.२२.१२.२०२० अन्वये सदर कपात रद्द करण्यात आले असल्यामुळे माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.०५.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार सल्लागारांचे वेतन अदा करण्यात येत आहे.

२. मे. ग्रॅन्ट थॉर्न्टन या संस्थेने दि.११.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांना दि.२६.०५.२०२१ पासून पुढील मुदतवाढ देणेबाबत विनंती केली होती. सदर पत्राच्या अनुषंगाने उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दि.१२.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये " To Extend for २ Years" असे निर्देश दिलेले होते. त्या अनुषंगाने मे. ग्रॅन्ट थॉर्न्टन या संस्थेकडील नियुक्त ०४ सल्लागारांना दि.२६.०५.२०२१ पासून ०६ महिन्याकरीता मुदतवाढ देण्याबाबत व नियुक्त सल्लागारांच्या कामकाजाचा वेळोवेळी आढावा घेऊन ०२ वर्षापर्यंत मुदतवाढ देणेबाबत विचार व्हावा असा प्रस्ताव मंडळाकडून दि.१८.०५.२०२१ रोजी शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.२५.०५.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मंडळाच्या आवश्यकतेनुसार ०६ महिने मुदतवाढ देण्यात यावी. मात्र मुदतवाढीची यापुढील कमाल मर्यादा ०२ वर्षे एवढी ठेवण्यात यावी व त्याप्रमाणे मंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता घेण्यात यावी असे निर्देश प्राप्त आहेत. सदर निर्देशास अनुसरून प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे. याबाबत सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८(१४)/२०२१:- शासन व मंडळ स्तरावरील कामकाजाकरीता माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या पॅनेलवरील मे. ग्रॅन्ट थॉर्न्टन या संस्थेकडून नियुक्त ०४ सल्लागारांच्या नियुक्तीस दि. २६.०५.२०२१ पासून पुढील ०२ वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. तथापि, नियुक्त सल्लागारांच्या कामकाजाचा आढावा घेऊन त्यांचे कामकाज समाधानकारक असल्यास दरवेळी ०६ महिने प्रमाणे मुदतवाढ देण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१५:- कामगार आयुक्त कार्यालय ४ था मजला व मंडळ मुख्यालयास साफसफाई करण्यास मे. अस्तित्व मल्टीपर्पोझ सर्व्हिसेस (ओ.पि.सी) प्रा. लि. यांना पूर्वीच्याच मंजूर दराने एक वर्ष मुदतवाढ देण्याबाबत विचारविनिमय करणे.**

यावाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दि.०४.०९.२०१९ रोजीच्या ५२ व्या बैठकीत पारित ठराव क्र.५२ (११)/२०१९अन्वये मंडळाचे मुख्यालय (५ वा मजला) व कामगार आयुक्त कार्यालय, बीकेसी बांद्रा (पूर्व) (४ था मजला) येथील साफसफाईकरीता विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून मे. अस्तित्व मल्टीपर्पोझ सर्व्हिसेस (ओ.पी.सी.) प्रा. लि. यांना दि. ०१.११.२०१९ ते ३१.१०.२०२० या एका वर्षाच्या कालावधीकरीता दरमहा रू.२४,५००/- प्रमाणे रू.२,९४,०००/- इतक्या वार्षिक खर्चासह साफसफाई व स्वच्छता करण्याबाबतचे कंत्राट देण्यात आले होते. सदर कंत्राटाची मुदत दि.३१.१०.२०२० रोजी संपुष्टात आली.

२. मे. अस्तित्व मल्टीपर्पोझ सर्व्हिसेस (ओ.पी.सी.) प्रा. लि.यांनी त्यांच्या दि. १५.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये गत वर्षाच्या मंजूर दराप्रमाणे काम करण्यास सहमती दर्शविली होती. सदर सहमतीस अनुसरून दरमहा रू. २४५००/- या दराने रू. २,९४०००/- इतक्या वार्षिक खर्चासह मंडळाचे मुख्यालय (५ वा मजला) व कामगार आयुक्त कार्यालयातील (४ था मजला) येथील साफसफाईकरीता मंडळाच्या दि. १८.०२.२०२१ रोजीच्या कार्यदेशान्वये दि. ०१.११.२०२० पासून दि.३१.१०.२०२१ पर्यंत पुढील एका वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

**ठराव क्र.५८(१५)/२०२१ :- मे. अस्तित्व मल्टीपर्पोझ सर्व्हिसेस (ओ.पी.सी.) प्रा. लि. यांना मंडळाचे मुख्यालय (५वा मजला) व कामगार आयुक्त कार्यालयातील (४ था मजला) येथील साफसफाईकरीता दि. ०१.११.२०२० पासून दि.३१.१०.२०२१ पर्यंत गतवर्षीच्या मंजुर दराने एक वर्षाकरीता देण्यात आलेल्या मुदत वाढीस व वार्षिक रू. २,९४,०००/- (अधिक वस्तू व सेवाकर) एवढया खर्चास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे , असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१६:- केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत वाटप करण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या लाभाचे Social Audit करणेबाबत विचारविनिमय करणे.**

यावाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मा. सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र. Civil No.३१८ of २००६ च्या संदर्भात दि.१९.०३.२०१८ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्र. ७५ मध्ये "it would be worthwhile and relvent for the state government and the welfare board in every state and union territory administration to conduct a social audit" असे नमूद केले आहे.

२. केंद्र शासनाच्या महानिदेशक श्रम कल्याण, श्रम एंव रोजगार मंत्रालय भारत सरकार यांनी त्यांच्या दि. २७.०८.२०१९ प्राप्त झालेल्या पत्रासोबत इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमाच्या अंमलबजावणी संदर्भात Social Audit करून घेणेबाबत मार्गदर्शक सुचना (Framework) निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर सुचनांच्या अनुषंगाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचे Social Audit करून घेणे आवश्यक आहे.

३. मा. नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या लेखा आक्षेपामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत Social Audit बाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना तयार केला असल्याचे व त्याच धर्तीवर मंडळाच्या योजनांतर्गत लाभ वाटपाचे Social Audit करता येईल असे नमूद केले आहे. नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या मार्गदर्शक सुचनांच्या आधारे, तसेच काही अनुभवी सामाजिक संस्थाच्या सहाय्याने केंद्र शासनाच्या दि.२७.०८.२०१९ रोजीच्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करून Social Audit करणे प्रस्तावित आहे. त्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५८(१६)/२०२१ :- मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दि.१९.०३.२०१८ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे तसेच श्रम एंव रोजगार मंत्रालय भारत सरकार यांनी त्यांच्या दि. २७.०८.२०१९ च्या पत्रानुसार निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या आधारे मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनेंतर्गत लाभ वाटपाचे Social Audit मे. यशदा किंवा टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्सेस या संस्थेमार्फत करण्यात यावे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१७:- मंडळाच्या जमा उपकर निधीच्या गुंतवणूकीचा गोषवारा मंडळाच्या मान्यतेस सादर करणे**

यावाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाने दि. २५.०५.२०२१ अखेर राष्ट्रीयकृत बँकेत गुंतवणुक केलेल्या रू. १०,४०० कोटी जमा उपकर रक्कमेच्या गुंतवणूकीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवणूक रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे | परिपक्व रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कॅनरा बँक,** ओव्हरसीस मुख्य शाखा, कॅनरा बँक | १५८९४०१००१६११/४ | ०८.०७.२०२० | ०८.०७.२०२१ | ७५० | ४.००% | ७८०.४५ |

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवणूक रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे | परिपक्व रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | बिल्डींग, सी-१४ जी ब्लॉक, बी. के.सी. वान्द्रे (पुर्व), मुंबई-४०००५१ | | | | | | |
| २. | **इंडियन बँक (ई-अलाहाबाद बँक),** (२७५५) वांद्रे कुर्ला संकुल आर्य विद्या मंदीर सोसायटी प्लॉट नं. एस एफ-१ जी.एन ब्लॉक युटीआय हेड कार्टर वांन्द्रे (पुर्व) मुंबई-४०००५१ | ५०५२२६५९१५१ Receipt No.८७७९६० | ०८.०७.२०२० | ०८.०७.२०२१ | २५० | ४.००% | २६०.१५ |
| ३. | **बँक ऑफ बडोदा,** बीकेसी ब्रॅन्च, सी-२६ जी ब्लॉक, वान्द्रे (पुर्व) मुंबई. | २९०४०३०००४०६१८ Receipt No.५९७२९० | ३१.०८.२०२० | ३१.०८.२०२१ | १००० | ३.७५% | १०३८.०३ |
| ४. | **पंजाब ॲन्ड सिंध बँक,** २७/२९ अम्बालाल जोशी मार्ग, फोर्ट मुंबई | ०३८५१४०००००७३५७ Receipt No.९१४४५७ | १२.१०.२०२० | १२.१०.२०२१ | १६०० | ३.७०% | १६६०.०२ |
| ५. | **इंडियन बँक (ई-अलाहाबाद बँक),** (२७५५) वांद्रे कुर्ला संकुल आर्य विद्या मंदीर सोसायटी प्लॉट नं. एस एफ-१ जी.एन ब्लॉक युटीआय हेड कार्टर वांन्द्रे (पुर्व) मुंबई-४०००५१ | ५०५३९५७१३८९ Receipt No. ४११९४३ | १४.०१.२०२१ | १४.०१.२०२२ | ११०० | ३.५०% | ११३९.०० |
| ६. | **युनियन बँक ऑफ इंडिया, (ई-आंध्रा बँक)** प्लॉट नं. ४७१-४७१, २४ रोड, खार रोड (पश्चिम), मुंबई - ४०००५२ | ११३११२०१००१०२१५२ Receipt No.१५६५३८ | २७.०१.२०२१ | २७.०१.२०२२ | १२०० | ३.६०% | १२४३.७८ |
| ७. | **युनियन बँक ऑफ इंडिया, (ई-आंध्रा बँक)** रोड, खार रोड (पश्चिम), मुंबई - ४०००५२ | ११३११३०३०००००५२ Receipt No.६५१०७१ | १६.०४.२०२१ | १६.०४.२०२२ | ११०० | ३.६६% | ११४०.८१ |
| ८. | **पंजाब ॲन्ड सिंध बँक,** २७/२९ अम्बालाल जोशी | ०३८५१४०००००७५५४ Receipt | ११.०५.२०२१ | ११.०५.२०२२ | ७०० | ३.७०% | ७२६.२६ |

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवणूक रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द.शे | परिपक्व रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मार्ग, फोर्ट मुंबई | No.९१४७०९ | | | | | |
| ९. | **युनियन बँक ऑफ इंडिया, (ई-कार्पोरेशन बँक)** वान्द्रे हिल रोड, वान्द्रे (पश्चिम), मुंबई | ०६२०२३०३०००००४१७ Receipt No.२३६८७० | १८.०५.२०२१ | १८.०५.२०२२ | १२०० | ३.७१% | १२४४.३८ |
| १०. | **पंजाब अँन्ड सिंध बँक**, २७/२९ अम्बालाल जोशी मार्ग, फोर्ट मुंबई | ०३८५१४००००७५६६ Receipt No.९१४७१० | २५.०५.२०२१ | २५.०५.२०२२ | १६०० | ३.७३% | १६६०.५१ |
| | | एकुण | | | १०,४०० | | १०७१०.३१ |

सदर मुदत ठेवींच्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज/Over Draft नसल्याबाबत संबंधित बँका दरमहा अहवाल मंडळास सादर करीत आहे. याशिवाय मंडळाचे लेखाअधिकारी व कर्मचारी यांनी दर तिमाहीस बँकांना समक्ष भेट देऊन मंडळाच्या गुंतवणुकीची खात्री केलेली आहे. मंडळाकडून लेखाअधिकारी व कर्मचारी यांचेकडून दि.०२.०६.२०२१ व दि. ०३.०६.२०२१ रोजी गुंतवणूक केलेल्या बँकांना समक्ष भेट देऊन मुदत ठेव रक्कम सुरक्षित असल्याची खात्री करण्यात आली आहे.

**ठराव क्र.५८ (१७)/२०२० :- मंडळाने गुंतवणूक उपसमितीच्या मान्यतेने दि. २५.०५.२०२१ अखेर रू. १०,४०० कोटीची गुंतवूणक विविध राष्ट्रीयकृत बँकेत केली आहे. गुंतवणूक उपसमितीच्या मान्यतेने केलेल्या रू. १०,४०० कोटीच्या गुंतवणूक गोषवाऱ्यास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला आहे.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**